# माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य पर्यावरण समिती

मा.श्री.बाळासाहेब सानप
अध्यक्ष : माऊली ट्रस्ट,राज्य पर्यावरण समिती
बारामती,जि.पुणे मो. ९८५०३००९०५
Email : maulitrust999@gmail.com

वृक्षदानातून-वृक्षारोपण
Mauli Green Army
www.mauligreenamy.com
Email :maulitrust9999@gmail.com

जा.क्र.

दिनांक 09.04.2023

**प्रति,**

मा. श्री. संजीव मेहता साहेब/ मयुरी काळे मॅडम

मा. प्राचार्य (सर्व), पुणे युनिव्हर्सिटी अंतर्गत महाविद्यालये. अहमदनगर / नाशिक/ पुणे

**विषय:-** सुशिक्षित बेरोजगारांचा बेरोजगारी हा विषय स्वयंरोजगारातून निकाली काढणे, व वनस्पती पर्यावरण अंतर्गत वृक्षदानातून शेतकऱ्यांच्या बांधावर वृक्षारोपण संगोपन करणे कामी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचा सहभाग मिळणे बाबत.

प्रस्तावना:- आषाढी कार्तिकी माऊली ट्रस्ट म्हणजेच माऊली ट्रस्टच्या अंतर्गत पर्यावरण, स्वयंरोजगार, या उद्दिष्टांवर राज्यस्तरावर कार्य करण्यासाठी, माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य पर्यावरण समिती, व माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य स्वयंरोजगार समिती, या दोन समित्या कार्यरत आहेत. समित्या मार्फत शासन व प्रशासना कडे प्रस्ताव दाखल केले जातात. विभागीय, जिल्हा, तालुका, स्तरावर व्यवस्थापनासाठी व्यवस्थापक. तसेच प्रत्येक तालुक्यामध्ये दहा ग्रामपंचायती पाठीमागे एका समन्वयकाची नियुक्ती केली जाते. प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये एक पर्यावरण दुत, व एक स्वयंरोजगार दुत, पदसिद्ध केले जातात. पर्यावरणदूत गावामध्ये देवराई निर्माण करण्याचे कार्य पार पाडतात. स्वयंरोजगारदूत गावामध्ये सुशिक्षित बेरोजगारांची स्वयंरोजगार सोसायटी मार्फत, गावाच्या भौगोलिक गरजा भागवण्याची जबाबदारी पार पाडतात.

**उपक्रम 1. पर्यावरण :-** माती, हवा, पाणी, वनस्पती, प्राणी या पैकी वनस्पती पर्यावरणासाठी माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य पर्यावरण समिती, मार्फत सहयोगराशीतून-वृक्षारोपण व संगोपन, हा उपक्रम मोबाईल अप्लिकेशन, " माऊली ग्रीन आर्मी " च्या माध्यमातून जिओ टॅगिंग चा उपयोग करून राबवला जात आहे. उपक्रमामध्ये एका व्यक्तीने स्वताला जिवंत राहण्यासाठी लागणाऱ्या ऑक्सीजन निर्मिती करिता सहा झाडांचे वृक्षदान करावयाचे आहे. नोंदणीकृत व्यक्तींनी प्रत्येकी एका दैवी वृक्षाचे वृक्षारोपण व संगोपन स्वताच्या जन्म नक्षत्र, व राशीनुसार करावयाचे आहे. मिळालेल्या वृक्षदानाच्या रकमेतून शेतकरी हरित सैनिक स्वताच्या शेतीच्या बांधावर, वृक्षारोपण व संगोपन करतील. शेतीच्या बांधावर अशा वृक्षांची एकूण संख्या वीस झाल्यानंतर, शेतकरी आपले स्वताचे जॉब कार्ड

R. P. Patil

| Proposed by | Authorised by | Approved by |
|---|---|---|
| व्यवस्थापक<br>विभागीय पर्यावरण उपसमिती | अध्यक्ष<br>राज्य पर्यावरण उपसमिती | अध्यक्ष<br>राज्य पर्यावरण समिती |

**माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य पर्यावरण समिती**

मा.श्री.बाळासाहेब सानप
अध्यक्ष : माऊली ट्रस्ट,राज्य पर्यावरण समिती
बारामती,जि.पुणे मो. ९८५०३००९०५
Email : maulitrust999@gmail.com

वृक्षदानातून–वृक्षारोपण
Mauli Green Army
www.mauligreenarmy.com
Email :maulitrust9999@gmail.com

जा.क्र.

ग्रामपंचायत मध्ये काढून घेतील. वृक्षारोपण केलेल्या झाडांची नोंद ग्रामपंचायत मध्ये करणे गरजेचे आहे. मागेल त्याला काम, हया शासनाच्या योजनेअंतर्गत शेतकरी हरित सैनिकास प्रतिदिन रुपये 248, असे वर्षातील अनेक दिवस, सलग तीन वरसे कालावधीसाठी, रोजगार मिळण्याची व्यवस्था केंद्र शासनाच्या योजनेमध्ये आहे. मोबाईल अप्लिकेशन मध्ये वृक्षदान करणाऱ्या व्यक्तीला, झाडांचा स्टेटस, 7 वर्षापर्यंत पाहण्याची सोय आहे. वृक्षदान करणारया प्रत्येक व्यक्तीला एक लाखाचा अपघाती विमा, हरित सैनिक आयडेंटिटी कार्ड, व स्वयंरोजगार मिळण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली जात आहे.

<u>**उपक्रम 2. स्वयंरोजगार:-**</u> माऊली ट्रस्ट अंतर्गत, माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य स्वयंरोजगार समिती, ही संस्था महाराष्ट्र शासनाच्या, सहकार, ग्रामविकास, कौशल्य विकास व उद्योजकता अंतर्गत, प्रशासकीय विभागातील, विभागीय, जिल्हा, तालुका, स्तरावरील आदेश पत्रासह सहकार्य, मार्गदर्शन, व सूचना घेऊन, प्रत्येक ग्रामपंचायती मधील 18 ते 40 वयोगटातील पाच महिला, आठ पुरुष, असे सुशिक्षित बेरोजगार संघटित करून, ग्रामपंचायतीच्या नावाने स्वयंरोजगार सोसायटी नोंदणीकृत करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. स्वयंरोजगार सोसायटीला उपक्रम राबवण्यासाठी लागणाऱ्या भांडवलासाठी राज्य शिखर बँकेचे आदेश, राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी घेण्यात आले आहेत. रोजगार म्हणजे सरकारी नोकरी, किंवा मोठ्या कंपनीमधील जॉब नव्हे. ग्रामपंचायत स्वयंरोजगार सोसायटी, व तालुका स्वयंरोजगार सोसायटी फेडरेशन अंतर्गत, औषध फवारणी ड्रोन, उत्पादक ते ग्राहक, एकत्रित खरेदी, सोलर फार्मिंग, हायटेक शेळीपालन, गोड्या पाण्यातील मोत्याची शेती, कृषी पर्यटन, वृक्ष दानातून वृक्षारोपण, इलेक्ट्रिकल चार्जिंग स्टेशन, शेतकरी दतक योजना, अशा उपक्रमातून राज्यातील ग्रामीण, निमशहरी, व शहरी, भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण- तरुणींना, बेरोजगार मुक्त करण्यासाठीची हमी माऊली ग्रीन आर्मी पर्यावरण समिती, घेत असून याकरिता उच्च शैक्षणिक संस्था, शासन व समाजाने सहकार्य करणे अपेक्षित आहे .

<u>**उपक्रम 3. ड्रोन पायलट ट्रेनिंग सेंटर:-**</u> भारता सारख्या शेतीप्रधान, देशामध्ये बदलत्या हवामानामुळे वारंवार पिकावर औषध फवारणी करावी लागते. वेळेची बचत, पाण्याची बचत, औषधावरील खर्च कमी, मातीचे व मानवाचे आरोग्य, उंच पिकावर फवारणी, करिता ड्रोन तंत्रज्ञान आवश्यक आहे. सुरक्षा, औद्योगिक, कृषी, वन, हवामान, सर्वे, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रामध्ये 45 पेक्षा जास्त, अप्लिकेशन साठी ड्रोनचा प्रभावीपणे वापर होत आहे.

| Proposed by | Authorised by | Approved by |
|---|---|---|
| व्यवस्थापक<br>विभागीय पर्यावरण उपसमिती | अध्यक्ष<br>राज्य पर्यावरण उपसमिती | अध्यक्ष<br>राज्य पर्यावरण समिती |

माऊली

॥ राम कृष्ण हरी ॥

नि.नं.५१२४३,पुणे (माऊली ट्रस्ट)

# माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य पर्यावरण समिती

मा.श्री.बाळासाहेब सानप
अध्यक्ष : माऊली ट्रस्ट,राज्य पर्यावरण समिती
बारामती,जि.पुणे मो. ९८५०३००९०५
Email : maulitrust999@gmail.com

वृक्षदानातून–वृक्षारोपण
Mauli Green Army
www.mauligreenarmy.com
Email :maulitrust9999@gmail.com

जा.क्र.

प्रत्येक महाविद्यालयामध्ये डीजीसीए, आर पी टी ओ लायसन, भारत सरकारच्या विमान मंत्रालयाचा, ड्रोन पायलट ट्रेनिंग सेंटर चालू करणे गरजेचे आहे. नजीकच्या काळात ड्रोन क्षेत्रामध्ये पायलट पदाच्या हजारो संधी उपलब्ध होणार आहेत. आपल्या महाविद्यालयाने हे ट्रेनिंग सेंटर चालू केल्यास कॉलेजच्या आजी माजी विद्यार्थ्यांना गाव पातळीवर रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील ज्या महाविद्यालयांना पायलट ट्रेनिंग सेंटर, सोसायटीच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार तसेच पर्यावरणामधून रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करून देण्यासंबंधी कार्यशाळा ट्रेनिंग घ्यावयाचे असल्यास माऊली ग्रीन आर्मीच्या, यशदा मान्यता प्राप्त मास्टर ट्रेनर टीम किंवा शिष्टमंडळास महाविद्यालयाकडून प्रवास निवास भोजन या गोष्टींची व्यवस्था करण्यात यावी. तसे पत्र कॉलेज मार्फत आमच्या संस्थेला मेल करण्यात यावे ही नम्र विनंती.

| Proposed by | Authorised by | Approved by |
|---|---|---|
| व्यवस्थापक<br>विभागीय पर्यावरण उपसमिती | अध्यक्ष<br>राज्य पर्यावरण उपसमिती | अध्यक्ष<br>राज्य पर्यावरण समिती |